सातारा | रविवार, ७ ऑक्टोबर २०१८
# पुण्य नगरी
वर्ष : १५ अंक : १८५ किंमत ४ रू. | पाने १२+४
www.epunyanagari.com | Toll Free 9773927928



# कोरेगावकर दिलेला शब्द पाळतात

## शरद पवार ; आ. शशिकांत शिंदे यांचे मतदार संघातले काम प्रभावी

**कोरेगाव** / प्रतिनिधी

कोरेगावकरांशी माझा जुना ऋणानुबंध असून गेली वीस - पंचवीस वर्षे आम्ही जो उमेदवार दिला तो तुम्ही निवडून दिला आहे. कोरेगावकर दिलेला शब्द पाळतात, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी केले. आ. शशिकांत शिंदे हे प्रभावीपणे काम करीत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

येथील डी. पी. भोसले कॉलेजच्या इमारतीचे भूमिपूजन कार्यक्रमात खा. शरद पवार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, आ. विश्वजित कदम, आ. शशिकांत शिंदे, रामशेठ ठाकूर, संजीव पाटील, भाऊसाहेब कराळे आदी उपस्थित होते.

आपल्या भाषणाच्या प्रारंभी त्यांनी एका चांगल्या कार्यक्रमाला आपणास हजर राहता आले याचा अपणास आनंद होत असल्याचे सांगून खा. शरद पवार पुढे म्हणाले, कोरेगावशी माझा जुना ऋणानुबंध आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आपण आल्यापासून गेली वीस पंचवीस वर्षे आम्ही दिलेला उमेदवारच तुम्ही निवडून दिला आहे. शंकरराव जगताप, शालिनीताई यांना आपण निवडून दिले. गेली १० वर्षे शशिकांत शिंदे यांना आपण निवडून देण्याचा शब्द तुम्ही दिला होता, तो तुम्ही पाळला. कोरेगावकर दिलेला शब्द पाळतात हे तुमचं वेगळं वैशिष्ट्य आहे. शशिकांत शिंदे टी. व्ही. चॅनेलवर आपली भूमिका ठामपणे मांडतात, ते मतदार संघातही गेली १० वर्षे प्रभावीपणे काम करीत आहेत.

### आ. शिंदे यांच्या निवासस्थानी केला नाष्टा

डी. पी. भोसले कॉलेजच्या इमारतीचे भूमिपूजन झाल्यानंतर खा. शरद पवार थेट आ. शशिकांत शिंदे यांच्या ल्हासुर्णे येथील निवासस्थानी आले. येथे पोहे, उपमाचा नाष्टा, चहा घेतला. आ. शिंदे यांच्या कुटुंबियांची विचारपूस केली, तसेच उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांशी त्यांनी चर्चा केली.

कोरेगाव तालुक्यात पूर्वी एकमेव कॉलेज होते. यशवंतराव चव्हाण, दादासाहेब जगताप यांनी रयतच्या माध्यमातून डी.पी.भोसले कॉलेज येथे आणले. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थिनी, विद्यार्थ्यांची सोय झाली आहे. विशेष म्हणजे या कॉलेजमध्ये ६८ टक्के विद्यार्थिनी शिक्षण घेत असल्याबद्दल त्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले. ६८ टक्के विद्यार्थिनी असलेले हे राज्यातले पहिले कॉलेज असेल. डी. पी. भोसले यांनी अतिशय कष्टातून उद्योग उभा केला. त्यांचा खोक्याचा व्यवसाय होता. त्यामुळे लोक त्यांना खोकिवाला भोसले म्हणत. रयत शिक्षण संस्थेतही त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

आ. शशिकांत शिंदे म्हणाले, कर्मवीरांनी दाखविलेल्या वाटेवरून शरद पवार यांची वाटचाल सुरू आहे. आज वेस्ट इंडीज विरुद्ध १३४ धावा उभारलेला पृथ्वी या खेळाडूस पवार यांनी भारताच्या संघात संधी मिळवून दिली. पृथ्वी, रोहित शर्मा हे गरीब कुटुंबातील खेळाडू असून हे खेळाडू पवारसाहेब यांच्यामुळे घडले आहेत. पवारसाहेबांची शाबासकी मिळाली तर काहीही घडते. मला इथलीही काही तरी जबाबदारी द्या, अशी मागणी आ. शिंदे यांनी शरद पवार यांच्याकडे केली.



कोरेगाव : डी.पी भोसले महाविद्यालयाच्या इमारती भूमिपूजन प्रसंगी खा. शरद पवार, डॉ. अनिल पाटील, आ. शशिकांत शिंदे आदी.